।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४३

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | रविवार दि १५ मार्च २०२६ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ११ वा

## सांगोल्यात पोलीस बंदोबस्तात गॅस सिलेंडर टाकीचे वितरण

### सिलेंडर साठी ऑनलाइन बुकिंग व ओटीपी असणे गरजेचे; चिंता नसावी ओटीपी दिल्यानंतर शासन व कंपनीच्या नियमानुसार सर्वांना सिलेंडर मिळणार

सांगोला : शासन व कंपनीच्या आदेशानुसार ऑनलाइन बुकिंग व ओटीपी असल्याशिवाय सिलेंडर गॅस टाकी मिळणार नाही. ऑनलाइन बुकिंग केल्यानंतर व ओटीपी दिल्यानंतर सर्वांना सिलेंडर मिळणार असून ग्राहकांनी सहकार्य करावे असे आवाहन गॅस एजन्सी चालक यांच्याकडून केले जात आहे. परंतु पूर्वी चार ते पाच दिवसात मिळणारा सिलेंडर आता ग्रामीण भागासाठी ४५ दिवस तर शहरी भागासाठी एक महिना प्रतीक्षा करावी लागत असल्याने नागरिकांची चांगली धावपळ उडाली आहे. दरम्यान गॅस एजन्सी समोर नागरिक गर्दी करत असल्याने काल शुक्रवारी पोलीस बंदोबस्तात ओटीपी व ऑनलाइन बुकिंग केलेल्या ग्राहकांना सिलेंडर वितरित करण्यात आले.



दरम्यान या परिस्थितीमुळे घरगुती ग्राहकांसह हॉटेल चालक, नाश्ता सेंटर चालक आणि लहान व्यवसाय अडचणीत आले आहेत.

सध्या अमेरिका, इस्त्रायल आणि इराणमध्ये भीषण युद्ध सुरू आहे. वा युद्धामुळे मध्य पूर्वेत मोठा तणाव निर्माण झाला असून, याचा परिणाम इंधन पुरवठ्यावर होत आहे.याचा थेट फटका सांगोल्यातील सिलेंडर धारकांना बसला आहे. गॅसचा प्रचंड प्रमाणात तुटवडा निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी गॅस नसल्यामुळे ग्राहकांना आता प्रतीक्षाच करावी लागत आहे तसेच हॉटेल बंद ठेवण्याची वेळ हॉटेल व्यावसायिकांवर आली आहे.

सांगोल्यात एच पी एजन्सी १ शाखा तसेच भारत गॅसची नाझरा, कोळा, घेरही, महूद, डोंगरगाव अशा एकूण पाच ठिकाणी शाखा आहेत. दरम्यान गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीत सुरू ठेवण्यासाठी शासनाच्या नियमानुसार आता ऑनलाइन बुकिंग व ओटीपी असणे गरजेचे आहे याबाबत नियम लागू करण्यात आला आहे. त्यानुसार गुरुवारी अनेक ग्राहकांनी ऑनलाईन बुकिंग साठी प्रयत्न ऑनलाईन बुकिंग ठप्प झाल्याचे नागरिकांनी सांगितले. सर्वर डाऊन असल्याने ऑनलाईन बुकिंग प्रक्रिया पूर्णपणे कोलमडली आहे. याबाबत ही नागरिकांनी संताप व्यक्त केला.

यामध्ये तालुक्यातील नागरिकांना शासकीय नियमानुसार सिलेंडर पुरवठा करण्यासाठी एचपी गैस एजन्सी कडून ओटीपी व ऑनलाइन बुकिंग केलेल्या नागरिकांना सिलेंडर टाकी वितरण करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सध्या वरिष्ठांच्या आदेशानुसार हॉटेल चालक व व्यवसाय धारकांना गॅस टाकी देण्यात येत नाही.
केवळ घरगुती वापरासाठी गॅस वितरण ऑनलाइन प्रक्रियेनंतर सुरू ठेवण्यात आल्याचे सांगण्यात आले.

ऑनलाइन बुकिंग केले शिवाय आणि ओटीपी दिल्याशिवाय गॅस टाकी मिळणार नाही. बुकिंग होत नाही. ओटीपी येत नाही. हा सर्वर प्रॉब्लेम वरून आहे. याबाबत ही वरिष्ठांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. लवकरच मार्ग निघेल असे सांगत, ब्लॅक मार्केट होऊ नये याची पूर्णपणे खबरदारी घेऊन, वितरण व्यवस्था काम करीत आहे. शासनाच्या व कंपनीच्या नियमानुसार कामकाज सुरू असून परिस्थिती नियंत्रणात येत नाही तोपर्यंत नागरिकांनी व ग्राहकांनी सहकार्य करावे असे आवाहन देखील गॅस एजन्सी चालकांकडून करण्यात आले आहे.

## पंचायत समितीची तब्बल पन्नास वर्षे अबाधित असलेली शेकापची सत्ता अखेर संपुष्टात

### सांगोला पंचायत समितीच्या सभापतीपदी भाजपच्या पूनम इंगवले तर उपसभापतीपदी शिवसेनेचे अजय सरगर

सांगोला : सांगोला तालुक्याच्या राजकारणात ऐतिहासिक उलथापालथ घडवत तब्बल पन्नास वर्षे अबाधित असलेली शेकापची सत्ता अखेर संपुष्टात आली असून पंचायत समितीवर पहिल्यांदाच भाजप- शिवसेनेचा झेंडा फडकला आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा करिष्मा पाहायला मिळाला. माजी आमदार दीपकआबा साळुंखे पाटील यांच्या गटातील तीन पंचायत समिती सदस्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने तालुक्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली. दरम्यान, पंचायत समितीच्या सभापतीपदी भाजपच्या पुनम इंगवले तर उपसभापतीपदी शिवसेनेचे अजय सरगर यांची बहुमताने निवड झाली.

दिपकआबांनी गेम फिरवल्याने गेल्या ५० वर्षापासूनची सांगोला पंचायत समितीवरील शेकापची सत्ता संपुष्टात आली असून पहिल्यांदा भाजप आणि शिवसेनेची सत्ता आली आहे. या सत्ता समीकरणात दीपकआबा पुन्हा एकदा 'किंगमेकर'च्या भूमिकेत दिसत असून त्यांच्या या निर्णयामुळे पंचायत समितीवर भाजपचा झेंडा फडकला आहे.

पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती निवडीसंदर्भात पंचायत समितीच्या कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी सभापती पदासाठी भाजपकडून पुनम इंगवले तर शेकापकडून काजल काशीद यांनी अर्ज दाखल केले. उपसभापती पदासाठी शिवसेनेकडून अजय सरगर तर शेकापकडून छाया कोळेकर यांनी अर्ज दाखल केले. यावेळी हात उंचावून मतदान घेण्यात आले. सभापती निवडीत भाजपच्या पुनम इंगवले यांना ८ तर शेकापच्या काजल काशीद यांना ६ मते मिळाली. उपसभापती पदाच्या निवडीत शिवसेनेचे अजय सरगर यांना ८ तर शेकापच्या छाया कोळेकर यांना ६ मते मिळाली. यांनतर सभापतीपदी भाजपच्या पुनम इंगवले व उपसभापतीपदी अजय सरगर यांची निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी बी. आर.माळी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी यांनी जाहीर केले.

दरम्यान, सभापती व उपसभापती निवडीप्रसंगी नगराध्यक्ष आनंदा माने, जिल्हा परिषद सदस्य दादासाहेब लवटे, शोभाताई खटकाळे, युवानेते सागर पाटील , सूरज पाटील, युवानेते यशराजे साळुंखे पाटील, गुंडांदादा खटकाळे, युवानेते योगेशदादा खटकाळे, उपनगराध्यक्ष नितीन इंगोले, नगरसेवक सोमेश यावलकर, बाळासाहेब काटकर, ॲड.सचिन देशमुख, संभाजी आलदर, यांच्यासह भाजप, शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

जिल्हा परिषद पंचायत समितीची निवडणुक भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत आणि शिवसेनेचे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी एकत्रित लढली होती. तर आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी माजी आमदार दीपकआबा साळुंखे यांच्यासोबत आघाडी करुन निवडणूक लढवली होती. यामध्ये शेकाप आघाडीने १४ पैकी नऊ जागा जिंकत बहुमत मिळविले होते. यामध्ये शेकापला ६ आणि दीपकआबा गटाला तीन जागा मिळाल्या होत्या.भाजपला एक आणि शिवसेनेने चार जागा जिंकल्या होत्या पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी ऑपरेशन लोटस यशस्वी करून दीपकआबा गटातील तीन सदस्यांचा भाजपमध्ये प्रवेश घडवून आणला.

विधानसभा निवडणुकीनंतर दीपकआबा साळुंखे पाटील हे तटस्थ भूमिकेत असून त्यांनी अद्याप कोणत्याही पक्षात अधिकृत प्रवेश केलेला नाही. मात्र दोन दिवसांपूर्वी घेतलेल्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत कार्यकर्त्यांना योग्य वाटेल तोच निर्णय घेतला जाईल असे सांगत त्यांनी राजकीय उत्सुकता अधिक वाढवली. त्यातच त्यांनी राजकारणात कोणी



कायमचा शत्रू नसतो आणि कोणी कायमचा मित्र नसतो, सत्तेसाठी तडजोडी कराव्याच लागतात, याची प्रचिती देऊन पंचायत समितीच्या तीन सदस्यांचा भाजपमध्ये प्रवेश करून शेकापच्या ५० वर्षाच्या सत्तेला सुरुंग लावला.

सांगोला तालुक्यातील प्रत्येक कार्यकर्त्याला मी आणि दिपकआबांनी एकत्र असावे असे वाटते. गेल्या दीड वर्षापासून आम्ही एकमेकापासून वेगळे होतो. आम्ही एकमेकांच्या विरोधात विधानसभा लढवली. परंतु कुठे ना कुठे आम्ही दोघे एकत्रच असावे असे देवाला सुद्धा वाटत असेल म्हणूनच आज पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापती निवडीच्या निमित्ताने आम्ही पुन्हा एकत्र आलो आहोत असे माजी आमदार शहाजीबापू पाटील यावेळी म्हणाले.

सामान्य जनतेचा विकास झाला पाहिजे हा माझा नेहमी आग्रह असतो. आगामी काळात जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमारभाऊ गोरे यांच्या नेतृत्वाखाली राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा वाहिनी पवार यांच्या माध्यमातून सांगोला तालुक्याचा गतिशील विकास व्हावा ही माझी भूमिका आहे. विकासाच्या मुद्द्यावर आपण सदैव माजी आमदार शहाजीबापू पाटील यांच्यासोबत राहू असे माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी यावेळी म्हणाले.दरम्यान सभापती व उपसभापती निवडीनंतर महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करीत फटाक्यांची आतिषबाजी केली.

# मुक्त विचार

## विचारधन



विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले!“

-महात्मा फुले

# अमेरिका–इराण संघर्षामुळे कच्च्या तेलाचा भडका; तुमच्या खिशाला झळ बसणार का?

जगातील राजकारणात एखाद्या ठिणगीचा ज्वालामुखी व्हायला फार वेळ लागत नाही. मध्यपूर्वेतील राजकारण हे तर कायमच बारूदाच्या ढिगाऱ्यावर उभे असते. अशाच परिस्थितीत पुन्हा एकदा अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव तीव्र झाला आहे आणि त्याचा सर्वात मोठा परिणाम जगभरातील अर्थव्यवस्थेवर, विशेषतः कच्च्या तेलाच्या किंमतींवर होताना दिसत आहे. कच्च्या तेलाच्या दराने घेतलेली उसळी ही केवळ आंतरराष्ट्रीय बाजारातील आकड्यांची गोष्ट नाही; ती थेट सर्वसामान्यांच्या खिशाशी, त्यांच्या रोजच्या आयुष्याशी आणि देशाच्या अर्थकारणाशी जोडलेली आहे. आज पेट्रोल पंपावर उभ्या असलेल्या सामान्य नागरिकाच्या मनात एकच प्रश्न घोंगावत आहे की, जगाच्या राजकारणात होणाऱ्या संघर्षाची किंमत आम्हालाच का मोजावी लागते? जगातील बहुतेक कच्चे तेल मध्यपूर्वेतून येते. इराण, सौदी अरेबिया, इराक, कुवेत, संयुक्त अरब अमिराती हे देश तेलसंपन्न आहेत. त्यामुळे या प्रदेशातील राजकीय तणावाचा थेट परिणाम जागतिक तेल बाजारावर होतो.

कच्च्या तेलाचे दर वाढले की पेट्रोल, डिझेल, एलपीजी गॅस, विमान इंधन यांचे दर वाढतात आणि त्यानंतर सुरू होते महागाईची साखळी प्रतिक्रिया. डिझेल महाग झाले की वाहतूक खर्च वाढतो. वाहतूक खर्च वाढला की भाजीपाला, धान्य, फळे, दूध, बांधकाम साहित्य अशा सर्व वस्तूंच्या किंमती वाढतात. शेवटी याचा सर्वात मोठा फटका बसतो तो सामान्य मध्यमवर्गीय आणि गरीब नागरिकांना. महागाई ही एक अशी आग आहे जी दिसत नाही, पण ती हळूहळू सर्वसामान्यांचे आयुष्य जाळत जाते. आज आधीच महागाईचा ताण वाढलेला आहे. घरभाडे वाढले आहे, शिक्षण महाग झाले आहे, आरोग्यसेवा खर्चिक झाली आहे. त्यात जर इंधनाच्या दरात वाढ झाली तर ती सामान्य माणसाच्या बजेटला अक्षरशः हादरवून टाकते. एका सामान्य कुटुंबाचा विचार करा. घरात नोकरी करणारा एक व्यक्ती आहे. महिन्याचे ठरलेले उत्पन्न आहे. घरभाडे, मुलांचे शिक्षण, वीजबिल, किराणा, औषधे सगळे खर्च ठरलेले आहेत. तेलाच्या वाढलेल्या किंमतीचे पडसाद संपूर्ण अर्थव्यवस्थेमध्ये पाहायला मिळतात. यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीपासून ते विमानाच्या तिकिटांचे दर वाढतांना पाहायला मिळतील आणि अखेरीच त्याचा फटका सर्वसामान्यांच्य खिशाला बसतो.

कच्च्या तेलाचे दर वाढल्याचा थेट परिणाम विमान वाहतुक सेवांवर होतो. विमान कंपनी चालवत असतांना त्यांच्या खर्चाचा एक मोठा भाग हा ईंधनावर खर्च केला जातो. जेव्हा कच्च्या तेलाच्या किंमतीत तीव्र वाढ होते, तेव्हा एव्हिऐशन टर्बाइन फ्युल चे दर देखील वाढतात. जर पेट्रोल १०–१५ रुपये वाढले तर त्याचा परिणाम केवळ वाहन चालवण्यापुरता मर्यादित राहत नाही. तो संपूर्ण घरखर्चावर परिणाम करतो. मग सुरू होते तडजोडीचे आयुष्य. कधी मुलांच्या शिक्षणात काटकसर, कधी आरोग्यावर तडजोड, कधी स्वतःच्या छोट्या आनंदांवर पाणी. जगातील महासत्तांच्या राजकारणाची किंमत अशा प्रकारे सामान्य नागरिक भरत असतो. तेल म्हणजे केवळ वाहन चालवण्यासाठीचे इंधन नाही. आजच्या आधुनिक अर्थव्यवस्थेचा तो कणा आहे. औद्योगिक उत्पादन, वाहतूक व्यवस्था, शेती, विमान सेवा, रासायनिक उद्योग या सगळ्यांचे जीवन तेलावर अवलंबून आहे. तेल महाग झाले की उत्पादन खर्च वाढतो. उत्पादन खर्च वाढला की वस्तू महाग होतात. म्हणजेच कच्च्या तेलाच्या किंमतीत वाढ म्हणजे संपूर्ण अर्थव्यवस्थेवर पडणारा आर्थिक भूकंप.

जगातील राजकारण अनेकदा शक्तीच्या खेळावर आधारित असते. महासत्ता आपले वर्चस्व टिकवण्यासाठी आर्थिक निर्बंध, लष्करी दबाव आणि राजनैतिक खेळी करत असतात. परंतु या सगळ्या खेळात सर्वात मोठे बळी ठरतात ते सामान्य नागरिक. इराणवर निर्बंध घालणे, तेलाच्या निर्यातीवर मर्यादा आणणे किंवा लष्करी तणाव वाढवणे, या सगळ्यांचा परिणाम थेट तेलाच्या पुरवठ्यावर होतो आणि त्यानंतर सुरू होते जागतिक बाजारातील किंमतींची स्पर्धा. तेलाचे दर वाढतात आणि त्याची झळ जगातील प्रत्येक देशाला बसते. या परिस्थितीत भारतासमोर मोठा प्रश्न उभा राहतो, आपण या संकटातून कसे बाहेर पडणार? कच्च्या तेलावर अवलंबित्व कमी करणे हा दीर्घकालीन उपाय आहे. सौरऊर्जा, पवनऊर्जा, इलेक्ट्रिक वाहने, जैवइंधन यांसारख्या पर्यायी ऊर्जा स्रोतांचा वापर वाढवणे आवश्यक आहे.

जगातील महासत्तांनी आपल्या राजकीय आणि लष्करी स्वार्थापलीकडे जाऊन मानवतेचा विचार करण्याची वेळ आली आहे. कारण एका देशातील संघर्षाची झळ आज संपूर्ण जगाला बसते. आज पेट्रोल पंपावर उभा असलेला सामान्य भारतीय नागरिक कदाचित जागतिक राजकारण समजत नसावा. त्याला माहित नसते अणुकरार काय असतो, निर्बंध काय असतात, किंवा मध्यपूर्वेतील भू-राजकारण काय असते. पण त्याला एक गोष्ट नक्की समजते की, पेट्रोल महाग झाले की त्याचे आयुष्य कठीण होते. अमेरिका–इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या किंमती पुन्हा वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. जर ही परिस्थिती नियंत्रणात आली नाही, तर त्याचा थेट परिणाम भारतासह अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेवर होणार आहे. जगातील राजकारणातील संघर्षांची किंमत शेवटी सामान्य नागरिकालाच मोजावी लागते, ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच आजचा खरा प्रश्न असा आहे की, जगातील महासत्ता आपले राजकारण थांबवतील का, की सामान्य नागरिकांच्या खिशाला पुन्हा एकदा झळ बसणार आहे? कारण कच्च्या तेलाच्या भडक्याची आग शेवटी पेट्रोल पंपावर नव्हे, तर सामान्य माणसाच्या जीवनात पेटते.

-प्रविण बागडे,नागपूर

# नात्यांमुळे विश्वास नसतो; विश्वासामुळे नाती असतात!

आजच्या काळात माणूस नात्यांनी वेढलेला आहे; पण तरीही एकटा आहे. घर आहे, कुटुंब आहे, मित्र आहेत, सोशल मीडियावर शेकडो कनेक्शन्स आहेत; पण तरीही मनात खोल कुठेतरी एक अस्वस्थ शंका दाटलेली आहे. खरंच माझ्यावर विश्वास ठेवणारा कुणी आहे का? कारण आज नात्यांची संख्या वाढली आहे; मात्र विश्वासाची उंची मात्र कमी होत चालली आहे. आपण अनेकदा गृहीत धरतो की नातं असेल, तर विश्वास आपोआप येईल. आई-वडील आहेत म्हणजे विश्वास, पती-पत्नी आहेत म्हणजे विश्वास, मित्र आहेत म्हणजे विश्वास. पण वास्तव वेगळंच सांगतं. नातं असणं आणि विश्वास असणं या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. खरं तर सत्य हे आहे, नात्यांमुळे विश्वास नसतो; विश्वासामुळे नाती असतात. नातं जन्माला येतं, पण विश्वास घडवावा लागतो. नातं अनेकदा जन्माने, कागदाने किंवा परिस्थितीने मिळतं. आई-वडील, भाऊ-बहीण, नवरा-बायको, नातेवाईक ही नाती आपल्याला विचारल्याशिवाय मिळतात. पण विश्वास मात्र मिळत नाही; तो कमवावा लागतो. तो शब्दांपेक्षा कृतीतून तयार होतो. तो एका दिवसात नाही, तर असंख्य छोट्या प्रसंगांतून आकार घेतो. आज आपण नात्यांवर हक्क सांगतो; पण विश्वासासाठी लागणारी जबाबदारी मात्र स्वीकारत नाही. मी तुझा आहे असं म्हणणं सोपं आहे; पण मी तुझ्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही हे जगणं कठीण आहे. विश्वास तुटला की नात्याचा सांगाडा उरतो. विश्वास तुटणं म्हणजे फक्त फसवणूक नव्हे.

कधी ऐकून न घेणं, कधी वेळ न देणं, कधी गरज असताना अनुपस्थित राहणं, कधी गोष्ट लपवणं, कधी सत्य टाळणं. या सगळ्या गोष्टी मिळून विश्वासाला हळूहळू पोखरत जातात. एकदा विश्वासाला भेग पडली की नातं जिवंत राहतं; पण आत्मा हरवतो. बाहेरून हसणं, औपचारिक बोलणं सुरू राहतं; पण आतला संवाद संपतो. मग नातं नावापुरतं उरतं, जणू एखादं जुनं घर, ज्यात भिंती उभ्या आहेत; पण ऊब नाही. आजच्या काळात माणूस नात्यांपेक्षा व्यवहारात जास्त प्रामाणिक दिसतो. व्यवहारात करार असतो, अटी असतात, कायदेशीर चौकट असते; त्यामुळे फसवणूक कमी होते. पण नात्यांत अशी कुठलीही चौकट नसते, तिथे फक्त विश्वास असतो आणि तोच आज सर्वात दुर्मिळ झाला आहे. म्हणूनच आज लोक व्यवहारात सावध, पण नात्यांत संशयी झाले आहेत. तो काय म्हणेल?, ती खरं बोलतेय का?, यामागे काही स्वार्थ तर नाही ना? अशा शंका नात्यांच्या मधोमध उभ्या राहिल्या आहेत. प्रेम असू शकतं; पण विश्वास नसेल तर ते प्रेम असुरक्षित होतं. मैत्री असू शकते; पण विश्वास नसेल तर ती सोयीची ठरते. नातं असू शकतं; पण विश्वास नसेल तर ते ओझं बनतं. विश्वास म्हणजे अंधपणा नाही.

विश्वास म्हणजे दुसऱ्याच्या हातात स्वतःचं मन सुरक्षित आहे, ही खात्री. विश्वास म्हणजे समोरचा आपली कमजोरी आपल्याविरुद्ध वापरणार नाही, ही निश्चिंतता. विश्वास म्हणजे आपलं मौनही समजून घेतलं जाईल, ही भावना. विश्वास मागता येत नाही, तो पात्रतेने मिळतो. आज अनेक नात्यांत एक विचित्र अपेक्षा दिसते, तू माझ्यावर विश्वास ठेवायलाच हवा पण विश्वास ही मागणी नाही; ती पात्रतेची पावती आहे. जो सातत्याने खोटं बोलतो, तो विश्वास मागतो. जो वेळ देत नाही, तो विश्वासाची अपेक्षा करतो. जो जबाबदारी टाळतो, तो विश्वासावर हक्क सांगतो. खरं तर विश्वास हा अधिकार नाही; तो सन्मान आहे आणि सन्मान नेहमी पात्रतेतून मिळतो. आज हा प्रश्न फक्त वैयक्तिक नात्यांपुरता मर्यादित राहिलेला नाही. समाज, संस्था, राजकारण, प्रशासन सर्वत्र विश्वासाचा दुष्काळ आहे. लोकांना माणसांपेक्षा कागदावर जास्त विश्वास वाटतो. शब्दांपेक्षा पुराव्याला जास्त किंमत आहे. कारण आपण वारंवार अनुभवले आहे की नाती बदलतात, पण फसवणूक कायम राहते. त्यामुळे माणूस हळूहळू स्वतःभोवती संशयाची भिंत उभी करतो. ती भिंत त्याला वाचवतेही; पण एकटंही करते.

विश्वास टिकवणं ही मोठी साधना आहे, म्हणजे दररोज स्वतःशी प्रामाणिक राहणं. चुकीची गोष्ट मान्य करणं. क्षमायाचना करणं आणि समोरच्याला गृहीत न धरणं. नात्यांत प्रेम कमी झालं तरी चालेल; पण विश्वास कमी होता कामा नये. कारण प्रेम पुन्हा निर्माण होऊ शकतं; पण तुटलेला विश्वास जोडणं फार अवघड असतं. आपण अनेकदा विचारतो की, लोक विश्वासघात का करतात? पण कधी स्वतःला विचारतो का, मी कुणाचा विश्वास जपला आहे का? मी दिलेला शब्द पाळला आहे का? मी कुणाच्या मनाशी प्रामाणिक राहिलो आहे का? जर आपण स्वतः विश्वासार्ह बनलो, तर नाती आपोआप अर्थपूर्ण होतील. कारण शेवटी सत्य एकच आहे, नाती असतात म्हणून विश्वास येत नाही; विश्वास असतो म्हणून नाती टिकतात.

-प्रविण बागडे,नागपूर

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष–४३ वे अंक–२० वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज आणि शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्यामध्ये सामंजस्य करार

सांगोला : विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष यंत्रसामुग्रीचा अनुभव मिळावा आणि त्यांच्यातील कौशल्य विकास वाढीस लागावा, या उद्देशाने शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज, सांगोला आणि शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सांगोला यांच्यात नुकताच एक महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. या कराराअंतर्गत सांगोला आयटीआय कॉलेजमधील विद्यार्थ्यांना शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमधील मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स विभागातील आधुनिक यंत्रसामुग्री, सुसज्ज प्रयोगशाळा आणि तांत्रिक उपकरणांची माहिती करून देण्यात आली.

तसेच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे तांत्रिक ज्ञान व कौशल्य विकसित करण्याची संधी मिळाली. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना दि.९ ते ११ मार्च असे तीन दिवस प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना विविध यंत्रसामुग्रीचे कार्य, त्यांचा वापर आणि तांत्रिक प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमासाठी शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज मधील मेकॅनिकल विभागाचे विभाग प्रमुख प्रा.संदीप बावचे, इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे विभाग प्रमुख प्रा.अभिषेक शिवशरण तसेच प्रा.विद्याधर पैलवान आणि प्रा.सिमरन इनामदार मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ.रणजीत देशमुख यांनी आपल्या मनोगतात अशा प्रकारच्या शैक्षणिक सहकार्यामुळे विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्यात वाढ होऊन त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मोठी मदत होईल,असे सांगितले. यावेळी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथील प्रा.शिकलगार व प्रा.घाडगे उपस्थित होते.

या उपक्रमामुळे आयटीआय विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख तांत्रिक शिक्षणाचा अनुभव मिळणार असून त्यांच्या कौशल्य विकासाला चालना मिळेल, असा विश्वास दोन्ही संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. सदरचा सामंजस्य करार हा संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष महादेव गायकवाड, सचिव अंकुश गायकवाड आणि विश्वस्त मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी रित्या पार पडला.

# फॅबटेक स्कूल मध्ये महिला दिनानिमित्त विविध उपक्रम



सांगोला : महिला सक्षमीकरण ही आधुनिक काळाची सर्वोच्च गरज आहे. सक्षम स्त्रीमुळेच प्रगत कुटुंब आणि सशक्त राष्ट्र घडते. महिलांना हे केवळ अधिकार दिला म्हणजे त्यांचा विकास होत नसून शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्य आणि निर्णय प्रक्रियेत समानता आणून त्यांना आत्मनिर्भर करणे आज काळाची गरज आहे. महिलांचा विकास समाज आणि देशाच्या विकासाचा मुख्य आधारस्तंभ असल्याचे मत फॅबटेक मल्टिस्टेट को-ऑफ क्रेडिट सोसायटी बँकेच्या संचालिका सुरेखा रूपनर यांनी महिला सन्मान सोहळ्यात बोलताना व्यक्त केले.

फॅबटेक पब्लिक स्कूल अँड जुनिअर कॉलेज सांगोला मध्ये ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून मेरा युवा भारत सोलापूर व श्लोक बहुउद्देशीय सामाजिक संस्था देवळे आणि फॅबटेक पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सुरेखा रूपनर ह्या होत्या. दरम्यान स्कूलचे प्राचार्य सिकंदर पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात प्रा. प्रियांका पावसकर, वनिता बाबर, वर्षा कोळेकर आदी महिला उपस्थित होत्या. या कार्यक्रमात पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मधील शिक्षिका मनिषा शिंदे, शितल बिडवे, महेश कुलकर्णी यांनी आपल्या महिलांना शुभेच्छा देऊन मनोगत व्यक्त केले.

महिला दिनानिमित्त संगीत खुर्ची आयोजित करण्यात आली होती. या मध्ये वर्षा जानराव प्रथम क्रमांक, फरीदा मुलाणी द्वितीय क्रमांक, वनिता बाबर तृतीय क्रमांक प्राप्त केला. याशिवाय रेश्मा तोडकर यांना उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात आले. श्लोक बहुउद्देशीय सामाजिक संस्था देवळे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अविनाश जावीर यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंचाक्षरी स्वामी यांनी केले आभार शितल बिडवे यांनी मानले.

## नीरा उजवा कालवा विभाग, फलटण
## म्हसवड मध्यम प्रकल्प उन्हाळा हंगाम सन २०२६
## जाहीर प्रकटन क्र.३ सन २०२६

**म्हसवड** मध्यम प्रकल्पावरील सर्व लाभधारकांना कळविण्यात येते की. उन्हाळा हंगाम सन २०२६ (दि.०१/०३/२०२६ ते दि.३०/०६/२०२६) करिता खालील प्रमाणे नियोजन करण्यात येत आहे.

१. आतापर्यंतची सर्व थकीत पाणीपट्टी नीरा उजवा कालवा विभाग, फलटण यांचे सिंचन आयडीबीआय बँक शाखा फलटण अकाउंट नंबर :- ०४६८१०४०००१४९४०२, आय.एफ.एस.सी कोड IBKL0000468 तसेच QR Code Scan करुन Online Payment स्विकारण्यात येईल.

२. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार प्राधान्याने शक्यतो चारा पिके करावयाची आहेत.

३. या हंगामासाठी उभ्या पिकांना न.नं.७ चे पाणी अर्ज **म्हसवड तलाव शाखा महूद** या शाखा कार्यालयात दि.०१/०३/२०२६ ते दि.३१/०३/२०२६ या कालावधीत शासकीय कामाकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत स्वीकारण्यात येतील. या मुदतीनंतर पाणी अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. तसेच पाणी मागणी अर्जासोबत प्राधान्याने ७/१२ उतारे सादर करावेत. याची कृपया नोंद घेण्यात यावी.

४. पाणी अर्ज दिला म्हणजे परवानगी मिळाली असे गृहीत धरु नये. उडाफा क्षेत्रास मंजुरी दिली जाणार नाही. आलेली एकुण मागणी व सिंचनासाठी उपलब्ध होणारे पाणी या बाबी विचारात घेउन केलेली मागणी अंशतः अगर पुर्णपणे नामंजुर करण्यात येईल.

५. म्हसवड कालव्यावर उपसा सिंचनास मंजुरी असणाऱ्या संस्था/ वैयक्तिक बागाईतदार यांनी त्यांचे नमुना नं.७ चे पाणी अर्ज स्वतंत्ररित्या शाखा कार्यालयास सादर करावेत.

६. बारमाही उपसा सिंचन योजनेचे मंजुरीधारक लाभधारकांनी नमुना नं.७ चे पाणी अर्ज विहीत वेळेत दयावेत. इतर योजनेवर मंजुर पिकाव्यतिरिक्त पिक केल्याचे आढळुन आल्यास सदर पिकांचे पंचनामे येउन दंडनिय दराने आकारणी करणेत येईल व मंजुरी कायमस्वरुपी रद्द करणेत येईल. उपसा सिंचनाव्दारे पाण्याचा उपसा केल्याचे आढळुन आल्यास संस्थेची / वैयक्तिक मंजुरी कायमस्वरुपी रद्द करण्यात येईल.

७. पाणी मागणी अर्ज न देणाऱ्या बागायतदारांना पाणी मागण्याचा हक्क राहणार नाही.

८. उन्हाळा हंगामात म्हसवड कालव्यासाठी मंजूर होणाऱ्या पाणीकोटयाच्या अधीन राहूनच पाणी पाळ्या देण्याचे नियोजन आहे.

९. लाभधारकांना आवाहन करण्यात येते की, पाण्याचा अनधिकृत वापर करु नये. अनधिकृत पाणी वापर करत असल्याचे निदर्शनास आल्यास सिंचन अधिनियम १९७६ मधील तरतुदीनुसार कडक कारवाई करणे भाग पडेल.

१०. शेतकरी / पाणी वापर संस्था हे ज्या शेतचारी वापरणार आहेत त्या सुस्थितीत ठेवली असली पाहिजे.

११. ज्या वितरिकांवरील सिंचन व्यवस्थापन पाणी वापर संस्थेकडे हस्तांतरीत झालेले आहे. अशा लाभक्षेत्रातील सिंचन पाणीपट्टीची थकबाकी संबंधित पाणी वापर संस्थांनी वसुल करुन शासनाकडे भरावी. अशा थकबाकीदार लाभधारकांना पाणी वापर संस्थेमार्फत पाणी पुरवठा करण्यात येवु नये व पाणी वापर संस्थांनी पाणी मागणी प्रत्येक लाभधारकांच्या पिकाच्या नावासह अर्जासोबत सादर करावी.

१२. थकबाकीदारांचे पाणी मागणी अर्ज स्वीकारले जाणार नाही, ते मंजुरही केले जाणार नाही व त्यांना पाणीही दिले जाणार नाही. तसेच चालु हंगामाची पाणीपट्टी रोखीने भरली पाहिजे.

१३. सदर जाहीर प्रकटनानंतर पाणी मागणी अर्ज प्राप्त झालेनंतर कालवा सल्लागार समितीच्या मान्यतेने सिंचन आवर्तन सोडण्यात येईल.

१४. अनुज्ञेय कालावधी नंतरच्या विलंबाने केलेल्या अदायगीकरिता आकारणी केलेल्या पाणीपट्टीवर अथवा त्याच्या हिश्यावर द.सा.द.शे. १० टक्के दराने विलंब शुल्क आकारणेत यावे.

१५. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचेकडील अधिसुचना दि.१२/०७/२०१९ अन्वये ३१आक्टोबर २०२० नं तर जलाशयावरील उपसा सिंचन योजनांना पाण्याची बचत करण्याचे तंत्र (ठिबक/ तुषारसिंचन ) वापरल्याखेरीज पिकांसाठी पाणी पुरवठा करणेत येणार नाही, याची नोंद घ्यावी. या आदेशाचे पालन न करणा-यांची पाणी उपसा परवानगी रद्द करणेत येईल.

१६. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचेकडील ठोक जलदर प्रशुल्क निर्धारण आदेश दि.२९/०३/२०२२ मध्ये पाणीपट्टी सुट/सवलती/ प्रोत्साहने नमुद करणेत आलेली आहेत. सदर सवलती मिळविण्यासाठी शाखा कार्यालयाकडे संबंधितांनी वेळीच संपर्क साधावा. वरील धोरणांनुसार व शर्तीनुसार पाण्याचे पास धारण करुनच पाण्याचा वापर नियमाप्रमाणे करणे बंधनकारक राहतील.

१७. महाराष्ट्र सिंचन कायदा अधिनियम १९७६ तसेच म.स.प.शे.व्य व इतर नियमांचे अधीन राहून पाणीपुरवठा करण्यात येईल.

१८. पाणीपट्टी रक्कम नीरा उजवा कालवा विभागाच्या QR Code वर भरावी. शाखा कार्यालय व उपविभागीय कार्यालयात QR Code उपलब्ध आहेत.

नैसर्गिक अथवा अनैसर्गिक कारणाने पाणी पुरवठा खंडीत झाल्यास अथवा बंद करावा लागल्यास पिकाचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई मिळणार नाही.

वरीलप्रमाणे करण्यात येणारा पाणी पुरवठ्यास महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६, कालवे नियम १९३४ तसेच, वेळोवेळी काढण्यात येणारे शासकीय आदेश / परिपत्रकातील सुचना लागु राहतील.

**सही/-**
**(ध.म. कोकरे)**
**उपकार्यकारी अभियंता**
**नीरा उजवा कालवा विभाग**
**फलटण**

जा.क्र.नीउकावि / प्रशा/५१२ / सन २०२६
दिनांक - २४/०२/२०२६
नीरा उजवा कालवा विभाग, फलटण

**स्थळ प्रत का.अ. यांना मान्य असे.**

प्रत - मा. अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.
प्रत - उपविभागीय अधिकारी, पंढरपुर पाटबंधारे उपविभाग, पंढरपूर यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत - शाखाधिकारी, म्हसवड तलाव शाखा महूद यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

जिमाका / सो/जाहि /३५९/२०२५-२६

निर्भिड व सडेतोड बातम्यांसाठी नियमित वाचा....
साप्ताहिक माणदेश वार्ता

# इथून पुढे शेकाप कोणाशीही युती,आघाडी करणार नाही- आ.डॉ.बाबासाहेब देशमुख



सांगोला : शेकाप व माजी आमदारांच्या सांगोला तालुका विकास आघाडीकडून निवडून आलेल्या तीन सदस्यांनी ऐनवेळी शेकापला दगा दिल्याने शेकापला पंचायत समितीत सत्तेपासून दूर रहावे लागले याबाबत आ. बाबासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कार्यकर्त्या मधून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली तर आ. बाबासाहेब देशमुख यांनी आता इथून पुढे शेकाप कोणाशीही युती,आघाडी करणार नाही आपण सर्व निवडणुका स्वबळावर लढ्या असे स्पष्ट सांगितल्याने या निर्णयाचे सर्व कार्यकर्त्यांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले,यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी भावना व्यक्त केल्या.

शेतकरी सह.सूत गिरणी कार्यस्थळावर झालेल्या बैठकीत संतोष देवकते,शिवाजी व्हनमाने यांनी निवडणुकी पूर्वीच्या नाट्यपूर्ण घडामोडी सांगितल्या.

नगरपरिषदेतं पराभव झाल्यानंतर कार्यकर्त्यांनी आ.बाबासाहेब देशमुख यांना शेकापने कोणाशीही आघाडी करू नये, आता स्वबळावर निवडणूक लढवूया असे सांगीतले होते व तसा पक्षांर्गत ठरावही पास झाला होता असे असताना आघाडीतील मित्र पक्षांने स्वतः आ. बाबासाहेब देशमुख यांचेकडे येऊन आम्हाला आघाडीत सामावून घ्या, स्व. आबासाहेब यांच्यापासूनची आपली पारंपरिक आघाडी आहे,आपण आघाडी करूया असे म्हणून तसा प्रस्ताव दिला होता, आपण आघाडीसाठी त्यांच्या मागे लागलो नव्हतो त्यानंतर सांगोला तालुका विकास आघाडी स्थापन करून आपण त्यांच्यासोबत आघाडी केली असे सांगून स्व.गणपतराव देशमुख यांनी सत्तेपेक्षा सर्वसामान्य, शेतकरी, दिनदलीत यांच्यासाठी जो आक्रमक बाणा स्वीकारला त्याप्रमाणे आता जनतेसाठी आक्रमक भूमिका घ्यावी, आपल्या पक्षाचा मूळ ढाचा लढाऊ वृत्ती असाच आहे त्यामुळे आपण राजकारणात नवखे आहात,आपण फसवले गेलो आहोत आता आक्रमक भूमिका घेऊया असे सांगून इथून पुढे एकला चलो रे अशीच भूमिका घ्यावी ,शेकाप विरुद्ध सगळे एकत्र येतात म्हणजे आपली ताकद आहे हेच सिद्ध होते, यावेळी आ. देशमुख यांना तुम्ही जो निर्णय घ्याल तो मान्य आहे अशी आग्रही भूमिका मांडली,यावेळी आ. देशमुख यांनी आलेल्या संकटाला आपण ऐकसंघ पणे सामोरे जाऊया इथून पुढे तुम्ही सांगाल तेच करू असे सांगून स्व.गणपतराव देशमुख हे आमदार,मंत्री होते पण त्यांनी सत्तेसाठी कधीही तडजोड, हव्यास केला नाही हीच आपली भूमिका असल्याचे सांगुन नवीन अनुभव आल्याने पुढील काळात सावध राहू असे सांगितले.

यावेळी चिटणीस दादा बाबर, खंडू सातपुते,नंदकुमार शिंदे, शिवाजी व्हनमाने, गजेंद्र कोळेकर यांनी भूमिका मांडली.

# सांगोला विद्यामंदिरचे तब्बल १७३ विद्यार्थी एनएमएमएस परीक्षेत पात्र

सांगोला : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या एन.एम.एम.एस. या परीक्षेत सांगोला विद्यामंदिर प्रशालेतील विद्यार्थ्यांनी दैदीप्यमान यश प्राप्त करत यशाची परंपरा राखली. या परीक्षेत प्रविष्ट एकूण विद्यार्थी २०२ पैकी १७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून १५० पेक्षा अधिक गुण मिळवणारे ०३ विद्यार्थी, १४० पेक्षा अधिक गुण मिळवणारे १८ विद्यार्थी, १३० पेक्षा अधिक गुण मिळवणारे ३५ विद्यार्थी, १२० पेक्षा अधिक गुण मिळवणारे ६३ विद्यार्थी, ११० पेक्षा अधिक गुण मिळवणारे ९९ विद्यार्थी, तर १०० पेक्षा अधिक गुण मिळवणारे १२८ विद्यार्थी आहेत. कुमारी सुबोधिनी गुंडोपंत इंगवले हिने १५६ गुण मिळवून प्रशालेमध्ये प्रथम क्रमांक येण्याचा मान मिळवला. सदर विद्यार्थ्यांना एनएमएमएस विभागातील सर्व शिक्षकांसह विभाग प्रमुख निलेश जंगम, संस्था बाह्यपरीक्षा विभागप्रमुख नामदेव खंडागळे, प्रशाला बाह्यपरीक्षा विभागप्रमुख सिताराम राऊत यांचे मार्गदर्शन लाभले. या उज्वल यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांसह पालक व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्था अध्यक्ष आदरणीय प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, संस्था उपाध्यक्ष ॲड.विजयसिंह चव्हाण, संस्था सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, संस्था सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, कार्यकारणी सदस्य विश्वेशजी झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, विभागनियंत्रक व पर्यवेक्षक प्रदिप धुकटे, उत्तम सरगर, काकासाहेब नरुटे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सदर परीक्षेची शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांची यादी लवकरच प्रसिद्ध होणार असून सांगोला विद्यामंदिर प्रशालेच्या परंपरेप्रमाणे प्रतिवर्षी विद्यार्थी एनएमएमएस परीक्षेमधून जवळपास ५० लाखांच्या आसपास शासकीय शिष्यवृत्ती संपादन करत असतात.

# नाझरे येथे शॉर्टसर्किटने घराला भीषण आग; ४० लाख ५० हजारांचे नुकसान

सांगोला : नाझरे ता. सांगोला येथील नाझरे गावातील रहिवासी रायाप्पा रामचंद्र पाटील यांच्या राहत्या घराला मंगळवार (दि.१० मार्च) रोजी शॉर्टसर्किटमुळे अचानक भीषण आग लागून संपूर्ण घर जळून खाक झाले. या आगीत कपडे, भांडी, सोने-चांदी, रोख रक्कम, अन्नधान्य तसेच संसारोपयोगी साहित्य जळून सुमारे ४० लाख ५० हजार रुपयांचे नुकसान झाले असून पाटील कुटुंब उघड्यावर पडले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मनोज रायाप्पा पाटील यांनी डाळिंब विक्रीतून आलेली रक्कम घरातील कपाटात ठेवली होती. मंगळवारी अचानक शॉर्टसर्किट होऊन घराला आग लागली. आग एवढी भीषण होती की घरातील सर्व वस्तू जळून खाक झाल्या. तसेच घराच्या छतावरील खांडे, दांडे व पत्रेही जळून गेले. मात्र सुदैवाने घरातील सर्व सदस्य वेळेत बाहेर पडल्याने मनुष्यहानी टळली. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थ, नातेवाईक व मित्रपरिवार यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अग्निशामक दलाला पाचारण करून आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करण्यात आले.या आगीत दूरचित्रवाणी संच, फ्रीज, वातानुकूलन यंत्र, पंखे तसेच इतर अनेक विद्युत उपकरणे जळून खाक झाली.पाटील कुटुंबाची उपजीविका प्रामुख्याने शेतीवर अवलंबून असून त्यांची आर्थिक परिस्थिती बेताची आहे.दरम्यान, घटनेचा पंचनामा मंडलाधिकारी हरिश्चंद्र जाधव, गावकामगार तलाठी राजेंद्र जाधव व पोलीस पाटील लक्ष्मण बनसोडे यांनी केला. या घटनेनंतर ग्रामस्थांकडून पाटील कुटुंबाला तातडीने मदत मिळावी अशी मागणी होत आहे. राजकीय नेते, दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था तसेच शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. तसेच आजी-माजी आमदारांनी लक्ष देऊन शासनाकडून जास्तीत जास्त नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.सध्या पाटील कुटुंब उघड्यावर पडले असून त्यांना तातडीच्या मदतीची गरज आहे.

# विद्यार्थ्यांनी समाज माध्यमांचा वापर जपून करावा,युवा पिढीचा मेंदू समाजमाध्यमांमध्ये आडकतोय : कवयित्री गुंजन पाटील

## सांगोला महाविद्यालयामध्ये वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण संपन्न



काव्यमय समाजप्रबोधणामुळे विद्यार्थी मंत्रमुग्ध त्यांच्या 'प्रेमातला भ्रष्टाचार', 'बायको', 'ती त्याच्या लग्नाला जाते तेव्हा', 'मला आई व्हायचं नाही' व 'राम' या त्यांच्या सुप्रसिद्ध कवितांना श्रोत्यांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. त्यांचे शब्दावरील प्रभुत्व आणि हृदयस्पर्शी काव्यमय समाजप्रबोधन यामुळे श्रोते चांगलेच मंत्रमुग्ध झाले होते.

सांगोला : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूंचा आणि आई वडिलांचा सन्मान करायला हवा हीच खरी बहादुरी आहे हे स्पष्ट करून, आधुनिकतेचा स्वीकार करत असताना मुलींनी सक्षम होऊन आपली संस्कृती जपली पाहिजे.विद्यार्थ्यांनी समाज माध्यमांचा वापर जपून करावा, कारण आजच्या युवा पिढीचा मेंदू समाजमाध्यमांमध्ये अडकतोय,असे मत सुप्रसिद्ध कवयित्री कु. गुंजन (ताई) पाटील यांनी व्यक्त केले. सांगोला महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ नुकताच पार पडला, यावेळी कवयित्री कु. गुंजन पाटील प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. या स्नेहसंमेलनाचे अध्यक्षस्थान सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळाचे अध्यक्ष बाबूराव(भाऊ) गायकवाड यांनी भूषविले. यावेळी उपाध्यक्ष तात्यासाहेब केदार, उपाध्यक्ष पी.सी.झपके, सचिव ॲड.उदय(बापू) घोंगडे, सहसचिव साहेबराव ढेकळे, संस्था सदस्य महादेव झिरपे (सर), विश्वनाथ चव्हाण, शामराव लांडगे, सुरेश फुले, सुधीर उकळे, प्रभारी प्राचार्य डॉ.सुरेश भोसले, वैजिनाथ घोंगडे आदी संस्था सदस्य व मान्यवर उपस्थित होते. दोन दिवस चाललेल्या या विद्यार्थी स्नेहसंमेलनामध्ये बुधवार दि.११ मार्च रोजी आयोजित 'शेलापागोटे' कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ.सुरेश भोसले यांचे हस्ते करण्यात आले. रांगोळी व मेहंदी स्पर्धेचे उद्घाटन संस्थासचिव ॲड. उदय ( बापू ) घोंगडे यांचे हस्ते करण्यात करण्यात आले. यावेळी महाविद्यालयीन स्तर पारितोषिक वितरण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या ' विविध गुणदर्शन' कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. गुरूवार दि.१२ मार्च रोजी संगीत शेलापागोटे कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी 'प्रेरणा' आणि 'गलक्सी' भिंतीपत्रकाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्या कवयित्री कु. गुंजन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले .यावेळी पुरस्कार प्राप्त प्राध्यापक,विद्यापीठ गुणवंत विद्यार्थी,सांस्कृतिक,युवा महोत्सव, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा, मेहदी, रांगोळी, कथाकथन, काव्यवाचन,निबंध व वकृत्व इत्यादी विभागातील यशवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांनी केले. कार्याध्यक्ष डॉ.विद्या जाधव यांनी अहवाल वाचन केले.पाहुणे परिचय डॉ. रामचंद्र पवार यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा.संतोष कांबळे,प्रा.प्रसाद लोखंडे यांनी केले. परीक्षक डॉ.विजयकुमार गाडेकर, कला शिक्षक प्रशांत मिसाळ, सहशिक्षिका श्रध्दा तेली, सहशिक्षिका सौ. स्मिता इंगोले, प्रा.सौ. रोशनी शेवाळे, कु.आरती बेंगलोरकर, नगरसेविका सौ. सुजाता केदार, नगरसेविका सौ.आशादेवी यावलकर, माजी नगरसेविका सौ. शोभा घोंगडे यांचेसह सर्व संस्था पदाधिकारी, सदस्य, हितचिंतक, साहित्यप्रेमी नागरिक, पत्रकार, सेवानिवृत्त प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी,पालक,विद्यार्थी उपस्थित होते. आभार डॉ.अमोल पवार यांनी मानले. हे स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी प्रभारी प्राचार्य डॉ.सुरेश भोसले, गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.रामचंद्र पवार, कार्याध्यक्ष डॉ.विद्या जाधव, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.संतोष लोंढे, प्रा.स्वप्निल शहा, प्रा. सौ. सोनल भुंजे, डॉ.भारत पवार, अधिक्षक विलास माने यांचेसह सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.